प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा
आदेश क्रमांक : ३४४ सन २०२५, दिनांक :१०/१०/२०२५

पहा:- ०१) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे गोपनिय पत्र बी (जन) ५६०१/५७/२०२४/ १६९७, दिनांक १३/०९/२०२४.
०२) जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक ३४१/२०२५, दिनांक ०६.१०.२०२५.
०३) जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक ३४२/२०२५, दिनांक ०६.१०.२०२५.
०४) दिनांक ०९.१०.२०२५ रोजीची कार्यालयीन टिपणी व त्यावरील पारीत आदेश.

उपरोक्त मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे संदर्भ क्र. ०१ मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या अटी व शर्ती अन्वये या जिल्हयाचे न्यायीक आस्थापनेवर शिपाई पदाची निवड / प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्रमांक ०२ व ०३ अन्वये या न्यायीक जिल्हयाच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या शिपाई पदाच्या अनुषंगाने तसेच संदर्भ क्रमांक ०४ अन्वये नियुक्ती व स्थलांतराबाबतचा आदेश खालील प्रमाणे पारीत करण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्मचा-यांचे नाव व पदनाम	नवीन नियुक्ती व स्थळ
०१	श्री. राहुल रमेश कदम, शिपाई पदाची निवड यादी (सन २०२३) मधील अनुक्रमांक ३९ वरील उमेदवार.	जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलडाणा यांचे आस्थापनेवर श्री. एस.व्ही.शेळके यांचे राजीनाम्याने रिक्त झालेल्या पदी शिपाई म्हणुन नविन नियुक्ती.
०२	श्री. भाऊसाहेब लक्ष्मण पातळे, शिपाई पदाची निवड यादी (सन २०२३) मधील अनुक्रमांक ४० वरील उमेदवार.	मुख्य न्यायदंडाधिकारी, बुलडाणा यांचे आस्थापनेवर श्री. आर.आर.मस्के यांचे पदी शिपाई म्हणुन नविन नियुक्ती.
०३	श्री. आर.आर.मस्के, शिपाई, मुख्य न्यायदंडाधिकारी, बुलडाणा यांची आस्थापना.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बुलडाणा यांचे आस्थापनेवर श्री. बी.के.राऊत यांचे राजीनाम्याने रिक्त झालेल्या पदी शिपाई म्हणुन.

स्थलांतरीत कर्मचारी यांनी आपले पदाचा कार्यभार दिनांक १३.१०.२०२५ रोजीचे मध्यान्हापुर्व द्यावा व आपले नुतन पदी पदग्रहण अवधी न घेता त्याच दिवशी दिनांक १३.१०.२०२५ रोजीचे मध्यान्हापूर्व रुजू व्हावे.

सदर्हु आदेश हा नवनियुक्त कर्मचाऱ्यांसाठी दिनांक १३.१०.२०२५ रोजीचे मध्यान्हापुर्वपासुन अंमलात येईल.

नवनियुक्त उमेदवार यांना सुचित करण्यात येते की, त्यांची या आदेशाद्वारे करण्यात आलेली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता शासनाचे सेवेतून कमी करण्यात येईल. तसेच त्यांची नियुक्ती मा. उच्च न्यायालय, मुंबई व जिल्हा न्यायालयाच्या भविष्यात होणाऱ्या आदेशाला अधिन राहुन करण्यात आलेली आहे याची त्यांनी नोंद घ्यावी.

त्यांना पुढे असेही सुचित करण्यात येते की, त्यांनी दिनांक १३.१०.२०२५ रोजीचे मध्यान्हापुर्वला किंवा त्यांना हा नियुक्तीचा आदेश मिळाल्यापासुन ०७ दिवसाचे आत त्यांनी त्यांचे शिपाई पदी रुजु व्हावे. तसे करण्यास चुकल्यास त्यांचे नाव निवड यादीवरुन काढून टाकण्यात येईल व त्यांचा नियुक्तीचा आदेश हा रद्द करण्यात येईल.

उपरोक्त सन २०२३ चे शिपाई पदाची निवड यादीतील उमेदवारांची वेतननिश्चिती एस-१, वेतन बॅण्ड १५०००-४७६००/- या सुधारीत संरचनेत रुपये १५०००/- या मुळ वेतनावर निश्चित करण्यात येत आहे.

उपरोक्त उमेदवारांनी कामावर रुजु झाल्यानंतर त्यांचे तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणुकीचे बंधपत्र, एकनिष्ठतेचे शपथपत्र, वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणि नियमानुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्वरीत नेमणुकीच्या ठिकाणी सादर करावी. तसेच त्यांना त्यांचे पदाचा राजीनामा स्वत:हून दयावयाचा झाल्यास ०१ महिना अगोदर तशी नोटीस अथवा त्या ऐवजी ०१ महिन्याचे वेतन त्यांना भरुन दयावे लागेल.

संबंधित पिठासीन अधिकारी यांना असेही सुचित करण्यात येते की, नवनियुक्त उमेदवार हे त्यांच्या आस्थापनेवर रुजू होताक्षणीच त्यांचे कडून आवश्यक ते प्रतिज्ञापन घेवून व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ, दिनांक २८.०८.२०१७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना दोन प्रतीत घेण्यात येवून पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा न्यायालयास पाठवावे.

उमेदवारांनी चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबतचे साक्षांकन नमुन्यामध्ये सादर केलेली माहिती असत्य आल्याचे आढळुन आल्यास निर्गमित करण्यात आलेले तात्पुरते नियुक्तीपत्र हे रद्दबातल करुन भारतीय न्याय संहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल व निवड यादीवरुन नाव कमी करण्यात येईल.

उपरोक्त उमेदवारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी शिपाई पदावर कर्तव्यावर हजर झाल्यानंतर पुरुष कर्मचाऱ्यांनी साधा पांढरा शर्ट, पांढरी पँन्ट व गांधी टोपी परिधान करणे अनिवार्य राहील.

Rkade
10/10/2025
(आर.एन.रोकडे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.

पृष्ठांकन क्रमांक/आस्था./५७४१ /२०२५, दिनांक : १०/१०/२०२५
प्रतिलिपी माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाही करीता रवाना.

०१. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बुलडाणा.

०२. मुख्य न्यायदंडाधिकारी, बुलडाणा.

०३. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलडाणा.

०४. श्री. राहुल रमेश कदम, राहणार- मु. पो. सोमठाणा, ता. बदनापुर, जिल्हा जालना ४३१ २०२ (नोंदणीकृत डाकेने पोच पावतीसह)

०५ श्री. भाऊसाहेब लक्ष्मण पातळे, राहणार- मु. पेंडु बु., पो. सेलु, ता. पालम, जिल्हा परभणी ४३१ ७२० नोंदणीकृत डाकेने पोच पावतीसह)

०६ अधिक्षक (कार्यव्यवस्थापन / तांत्रीक विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०७ सहायक अधिक्षक (आस्थापना / वित्त व लेखा विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०८ वरिष्ठ लिपीक (वेतन देयक / सेवानिवृत्ती प्रकरणे / प्रवास भत्ता), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०९ अध्यक्ष / सचिव, जिल्हा न्यायालयीन कर्मचारी पत संस्था, खामगांव.

१० सहायक, संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सदरचा आदेश वेबसाईट / ई-मेल वर टाकावा.

११. कार्यालय प्रत.

E:\Estt\1\Estt\NJR 4.docx

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, बुलडाणा